# जाहिर निविदा
# चिपळूण नगर परिषद.

चिपळूण नगर परिषद हद्दीतील खालील रकाना २ मधील भागामध्ये रकाना ३ मधील सेवा पुरविणेबाबतचे उक्त काम रक्कम रुपये सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत. सिलबंद निविदा दोन लखोटा पध्दतीने मागविणेत येत आहेत. इच्छुक संस्था/व्यक्ती/कंपनी यांनी त्यांच्या विहीत नमुन्यातील सिलबंद निविदा दिनांक १८/०७/२००९ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत प्रशासकीय अधिकारी यांचे चेंबर मधील निविदा पेटीमध्ये टाकाव्यात.

| अ.क्र. | कामाचे नाव | पुरवठयाच्या सेवा | निविदा फॉर्मची रक्कम | निविदा सोबत भरावयाची इसारा रक्कम | कामाचा कालावधी | निविदाधारकांची पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पाणी पुरवठा व्यवस्थापन सेवा पुरविणे | गोवळकोट, कांगणेवाडी, पाग, उपनगर पंपहाऊस केंद्र ऑपरेट करुन त्याची देखभाल करणे व त्याची स्वच्छता ठेवणे, क्लोरीन गॅस युनिट चालविणे, तुरटी व ब्लिचिंग पावडरचा वापर करणे, टाकीमधून शहरात ठिकठिकाणी वेळेत व्हॉल्व ऑपरेट करुन पाण्याचे वितरण करणे. असणारे साठवण टाकीचा परिसर स्वच्छ ठेवणे व टाकी, पंपहाऊस केंद्र, फिल्ट्रेशन प्लँट इमारत, पंपचालक निवासस्थान याची स्वच्छता ठेवणे. शहरातील दररोज होणारी पाईप लाईन गळती काढणे कामी खोदाई करणे, खड्डे भरणे वगैरे कामे करणे | १५००/- | २०,०००/- | ९ महिने. | १. रजिस्टर मजूर सहकारी संस्था मर्या.आवश्यक ते रजि. प्रमाणपत्र.<br>२.सेवा पुरविणे कामासंबधी अनुभवाबाबत दाखले असणे आवश्यक.<br>३.नियुक्त करणार असणारे कर्मचारी यांची योग्य ती पात्रते त्यासंबधी आवश्यक दाखले सोबत जोडणे आवश्यक आहे. (उदा.पंप ऑपरेटर) तसेच कर्मचारी यांची यादी सोबत जोडणे आवश्यक आहे. |

**अटी व शर्ती खलील प्रमाणे :-**

१. निविदा फार्म नगर परिषद लेखा विभागात विहीत नमुन्यातील अर्जासोबत (रकाना ४ मधील) फॉर्मची किंमत रोखीने एक खिडीकमध्ये भरल्यानंतर अभिलेख व भंडार विभागात दिनांक १५/०७/२००९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत उपलब्ध होतील.
२. निविदा दोन लखोटा पध्दतीने भरावयाची असून लखोटा १ मध्ये पात्रता संबधी कागदपत्रे तसेच निविदा अनामत रकाना क्र.५ मधील रक्कमेचा मुख्याधिकारी, चिपळूण नगर परिषद यांचे नावे असलेला डी.डी. अथवा ठेव पावती किमान १ वर्षे मुदतीची ठेवणे आवश्यक आहे.
३. निविदा पूर्व बैठक दिनांक १६/०७/२००९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता मुख्याधिकारी चेंबरमध्ये होईल.
४. निविदा लखोटा क्र.१ दिनांक १८/०७/२००९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता उपस्थित निविदाधारकांसमोर उघडण्ेत येतील.
५. निविदा लखोटा क्र.१ मधील पात्र निविदाधारकांची यादी त्याच दिवशी सायंकाळी ६.०० वाजता नगर परिषदेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल व त्याबाबत आक्षेप दिनांक २०/०७/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत स्विकारणेत येतील.
६. पात्र निविदाधारकांच्या निविदा दिनांक २०/०७ /२००९ रोजी सायंकाळी ५.०० वाजता उपस्थित निविदाधारकांसमोर उघडणेत येतील.
७. निविदा भरणेपूर्वी निविदा फॉर्म व प्रारुप करारनामा मधील अटींचा अभ्यास करुन निविदाधारकांनी निविदा भरावयाची आहे. निविदा लाखेने सिलबंद असणे आवश्यक. निविदा अपूर्ण आढळल्यास फेटळण्यात येईल व दरपत्रक उघडले जाणार नाही.
८. सर्व अथवा कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार राखून ठेवणेत आलेला आहे.

दिनांक :- ०९/०७/२००९
निविदा सुचना क्रमांक -

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद.

**टिप :-** सविस्तर निविदा सूचना नगर परिषदेचे www. cmcchiplun.org या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

## पाणी पुरवठा व्यवस्थापनाचे सेवा पुरविणे संबधी अटी व शर्ती.

१. पाणी पुरवठा व्यवस्थापनाचे सेवा पुरवठा धारकांने निविदा मंजूर झाल्यावर सोबतचे करारनाम्याप्रमाणे करारनामा करावयाचा आहे. त्यासोबत अनामत म्हणून देकारांचे १.५० टक्के रक्कम चिपळूण नगर परिषद यांचे नांवे डि.डि अथवा ठेव स्वरुपांत भरावयाची आहे. (ठेव किमान १ वर्षे मुदतीची असणे आवश्यक आहे.)

२. सेवा पुरवठा धारकाला देकारे चे प्रमाणे दरमहा ठोक रक्कम चेकने देणेत येईल.

३. सेवा संबधी कोणतीही तक्रार आल्यास तसेच याबाबतीत चौकशी व पहाणी मध्ये ठेकेदार यांचा दोष आढळल्यास मुख्याधिकारी ठरवतील तेवढी सेवेची रक्कम बीलातून कापून घेण्यात येईल.

४. दररोज कामासंबधी अहवाल मेस्त्री पाणी पुरवठा विभाग यांचेकडे सकाळी ११ पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. सदर अहवालाबाबत मेस्त्री यांचा पहाणी अहवाल मुख्याधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

५. सेवा पुरवठादार यांचे कामासंबधी कोणताही वाद उत्पन्न झाल्यास याबाबत नगर परिषदेचा निर्णय बंधनकारक असेल.

६. सेवा पुरवठादार यांनी सेवा पुरवतांना हलगर्जीपणा केल्यास त्याबाबत जास्तीत जास्त दोनवेळा सुधारणा करणेसबंधी संधी देणेत येईल. व त्यानंतर सुधारणा न झाल्यास एकतर्फि ठेका रद्द करणेचा अधिकार नगर परिषदेला असेल. व त्यामुळे होणारे नगर परिषदेचे नुकसान ठेकेदारांची अनामत अथवा महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक शहरे अधिनियम १९६५ चे कलम १५०,१५१,१५२,१५३ प्रमाणे वसुलीची कार्यवाही करणेत येईल.

७. सेवा पुरवठाधारकाने दरमहाचे बील महिन्याच्या शेवटच्या कार्यालयीन दिवशी मेस्त्री, पाणी पुरवठा यांचेकडे सादर करावे. नगर परिषद सदरचे बील ८ कार्यालयीन दिवसांत देईल. नगर पालिकेने सदर बील ८ दिवसांत न दिल्यास ६ टक्के दराने व्याज देणेत येईल.

८. सेवा पुरवठाधारकाला निवीदा देकाराव्यतीरिक्त कोणताही शासकिय कर बिलावर आकारता येणार नाही. शासकिय सर्व कर आवश्यक असल्यास आवश्यक ते परवाने सेवा पूरवठाधारकाने स्वतः घेणेचे आहेत. याबाबतीत कोणतीही कायदेशीर बाबीसाठी नगर परिषद जबाबदार असणार नाही.

९. सेवा पुरवठाधारकाला आवश्यकतेप्रमाणे अपेक्षित सेवा पुरविण्याकरीता गाड्या, मजूर, तांत्रिक कर्मचारी लावता येतील. मात्र कामगार कायद्यांची काटेकोर करणेची जबाबदारी सेवा पुरवठादाराची असेल.

१०. सेवा पूरवठाधारकांने अेकदा देकार भरल्यानंतर बाजारभावात वाढ झाल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणांनी देकाराची मुदत संपेपर्यंत कोणतीही भाववाढ देणेत येणार नाही.

११. सेवा पुरवठाधारकांनी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना ओळख पत्र देणे आवश्यक आहे. ओळखपत्र कर्मचाऱ्यांनी कामावर असतांना वापरणे बंधनकारक आहे.

१२. निविदा देकार मंजूर झाल्यास सेवा पुरवठाधारकाला योग्य मुद्रांकावर करारनामा करुन घ्यावा लागेल. करारनाम्यातील अटी व शर्ती सेवा पुरवठाधारकावर बंधनकारक असतील.

१३. सेवा पुरवठा धारकाचे कामाचे पर्यवेक्षण मेस्त्री, पाणी पुरवठा करतील तसेच सेवांचे मुल्यांकन मुख्याधिकारी व नगर परिषद पाणी पुरवठा समितीमार्फत केले जाईल.

१४. पाणी शुध्दीकरण करणेकामी ब्लिचींग पावडर, तुरटी तसेच क्लोरीन सिलेंडर वापर नगर परिषदेने ठरवुन दिलेल्या प्रमाणा प्रमाणेचे करणेचे आहे. त्यामध्ये कमी प्रमाण आढळल्यास

(ओटी टेस्ट) त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदार यांचेवर राहिल. व त्याप्रमाणे ठेकेदार यांचेवर कारवाई करणेत येईल.

१५.ठेकेदारांकडून प्रत्येक पंप हाऊस केंद्रातील लॉग बुक, मिटर रिडींग बुक, पॉवर फॅक्टर याचे नोंदी नगर परिषदेने दिलेल्या लॉग बुकामध्ये रोजच्या रोज प्रति तासाला नोंदी घेणेच्या आहेत.

१६.तांत्रिक बिघाड अगर हलगर्जीपणामुळे कर्मचाऱ्यांकडून नगर परिषदेचे पंपाना अथवा मोटारना नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई ठेकेदाराने द्यावयाची आहे.

१७.करारनाम्यातील अटी व शर्ती तसेच वरील नमूद सर्व अटींचा सेवा पुरवठादाराकडून भंग झाल्यास उपरोक्त ८ प्रमाणे ठेका रद्द करुन नुकसान वसूल करणेत येईल.

वरील अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक व मान्य असल्याबद्दल मी खाली सहि करीत आहे.

निविदा धारकाची सहि.
कंपनी / संस्था असल्यास
त्याचा रबर स्टॅम्प आवश्यक.